# बौद्धिक संपदा अधिकार: गरज आणि आव्हाने

**प्रा. डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे,** विभाग प्रमुख व प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग व समन्वयक, नेहरू अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. **Email:-** ravindrabhanage105@gmail.com

---

**सारांश :**

शोध ज्याला संशोधन व विकास म्हटले जाते त्यातुन बौद्धिक संपदा कल्पना विकसित व विस्तारीत झाली'. जेव्हा एखादी व्यक्ती किंवा संस्था आपल्या बुद्धीचा वापर करून एखादी निर्मिती करते तेव्हा त्या निर्मितीवर मर्यादित काळापुरती तिला प्राप्त झालेली मक्तेदारी होय. बौद्धिक संपदेचा अधिकार कायद्याचा मुख्य उद्देश वेगवेगळ्या प्रकारची बौद्धिक संपदा निर्मिती करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे यातून आर्थिक लाभा बरोबरच नवनवे शोध व कलाकृती निर्मितीस प्रोत्साहन मिळते. ब्रिटिश शासनाचा मोनॉपोलिसचा कायदा हा कॉपीराईट कायद्यांचे तर अॅनचाकायदा हा पेटंट कायद्यांचे आद्य स्वरूप मानले जाते. पॅरिस परिषद, बर्नपरिषद या आंतराष्ट्रीय परिषदांच्या माध्यमातून आंतराष्ट्रीय स्तरावरबौद्धिक संपदांचे नियमन करण्याचा प्रयत्न सुरू झाला. सध्या संयुक्त राष्ट्रसंघटनेची सहायक संस्था असलेल्या जागतिक बौद्धिक संपदा संघटनेकडून (WIPO) याबाबतची प्रकरणे हाताळण्यात येतात.वेगवेगळ्या प्रकारचे बौद्धिक संपदा हक्क त्यांच्या निर्मात्याला यानिर्मितीवर ठरावीक काळापुरते सर्वसाधारणपणे२० वर्षे स्वामित्व हक्क बहाल करतात. बौद्धिक संपदा कोणकोणत्या? तर 'नवनव्या संशोधनांवर देण्यात येणारी पेटंट, उत्पादनांची चिन्हे म्हणून वापरली जाणारे ट्रेडमार्क्स, पुस्तके, संगीत, चित्रपटावर दिले जाणारे कॉपीराइट, भौगोलिक निर्देशक, औदयोगिक डिझाइन, ट्रेड सिक्रेट्सइत्यादींचा बौद्धिक संपदेमध्ये समावेश होतो.

**Keywords :**

बौद्धिक संपदा, अधिकार, कॉपीराईट, WIPO, नवनिर्मिती, मोनोपोलीसचा कायदा, पेटंट, बौद्धिक संपदा कायदा, मेक इन इंडिया, विकसित देशांचे धोरण, विकसनशील देशांचे धोरण, मुलभूत हक्क व स्वामित्व हक्क यातील द्वंद्व.

**प्रस्तावना :**

व्यवस्थापन तज्ज्ञ पिटर उकर म्हणतात,'जगभरातील सर्व संस्था संघटना फक्त दोन गोष्टी करतात बाजार पेठ सांभाळणे व संशोधन संयोजन म्हणजे कल्पना निर्मिती, शोध ज्याला संशोधन व विकास म्हटले जाते त्यातुन बौद्धिक संपदा कल्पना विकसित व विस्तारीत झाली'. बौद्धिक संपदा अधिकार म्हणजे काय ? जेव्हा एखादी व्यक्ती किंवा संस्था आपल्या बुद्धीचा वापर करून एखादी निर्मिती करते तेव्हा त्या निर्मितीवर मर्यादित काळापुरती तिला प्राप्त झालेली मक्तेदारी होय. बौद्धिक संपदेचा अधिकार कायद्याचा मुख्य उद्देश वेगवेगळ्या प्रकारची बौद्धिक संपदा निर्मिती करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे यातून आर्थिक लाभा बरोबरच नवनवे शोध व कलाकृती निर्मितीस प्रोत्साहन मिळते.

**बौद्धिक संपदा अधिकाराचा विकास :**

ब्रिटिश शासनाचा मोनॉपोलिसचा कायदा हा कॉपीराईट कायद्यांचे तर अॅनचाकायदा हा पेटंट कायद्यांचे आद्य स्वरूप मानले जाते. पॅरिस परिषद, बर्नपरिषद या आंतराष्ट्रीय परिषदांच्या माध्यमातून आंतराष्ट्रीय स्तरावरबौद्धिक संपदांचे नियमन करण्याचा प्रयत्न सुरू झाला. सध्या संयुक्त राष्ट्रसंघटनेची सहायक संस्था असलेल्या जागतिक बौद्धिक संपदा संघटनेकडून (WIPO) याबाबतची प्रकरणे हाताळण्यात येतात. WIPO ही संघटना संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सदस्य देशांनी १९६७ मध्ये केलेल्या करारान्वये जिनिव्हा येथेस्थापन करण्यात आली आहे. १९७२ पासून ती क्रियाशील बनली.

बौद्धिक संपदेच्या मालकाने तिच्या वापराचे नियंत्रित हक्कआर्थिक मोबदला घेऊन एखाद्या व्यक्तीला दिले तर त्याचा दोघांनाही फायदा होईलआणि त्यातून समाजासही त्या नवनिर्मितीचा फायदा होईल. हा विचार बौद्धिकसंपदा कायद्यांमधील तरतुदींमागे आहे.

**बौद्धिक संपदा अधिकारांचे फायदे**

* **आर्थिक फायदे**

बौद्धिक संपदेच्या मालकाने तिच्या वापराचे नियंत्रित हक्क घेऊन एखाद्याव्यक्तीला दिले तर तिच्या प्रस्तावित उत्पादनासाठी तिला गुंतवणूकदार मिळतो.तर गुंतवणूकदारास एक नावीन्यपूर्ण उत्पादन बाजारात आणून त्यातून नफाकमावता येतो. अशा प्रकारे त्याचा दोघांनाही यातून आर्थिक फायदा होतो.

* **आर्थिक विकास**

संयुक्त राष्ट्रच्या सहा आशियाई देशांच्यासर्वेक्षणातून बौद्धिक संपदा प्रणालींचा देशांच्या आर्थिक विकासाशी

जवळचासंबंध असल्याचे समोर आले आहे. नवे संशोधन, नवी उत्पादने आणि नव्या प्रणालीयांच्या माध्यमातून आर्थिक विकासास चालना मिळत असते. त्या दृष्टीने बौद्धिकसंपदेचे देशांच्या आर्थिक विकासातील महत्त्व लक्षात येते.

* **नैतिक हक्क – श्रेय**

मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्यामध्ये प्रत्येक व्यक्तीस तिनेनिर्माण केलेल्या वैज्ञानिक, साहित्यीक किंवा कलात्मक निर्मितीशी संबंधितनैतिक आणि भौतिक हितसंबंधांच्या संरक्षणाचा अधिकार आहे. मानवी हक्क आणिबौद्धिक संपदा अधिकार यांमधील परस्परसंबंध गुंतागुंतीचे आहेत. मात्रनिर्मात्याचा त्याच्या निर्मितीवर हक्क असणे हा नक्कीच नैतिक मुद्दा आहे.

एखाद्या व्यक्तीची बौद्धिक संपदा ही तिच्या व्यक्तिमत्त्वाचाच भागअसल्याने त्यावर तिचा हक्क असतो असे काही लोकांचे म्हणणे आहे. तरनवनिर्मितीसाठी एखाद्या व्यक्तीने केलेल्या कष्टांचा मोबदला म्हणुन त्यावरत्या व्यक्तीचा अधिकार असला पाहिजे असे काही इतरांचे म्हणणे आहे. तर आपल्यानिर्मितीस योग्य पद्धतीने मोबदला मिळतो याची खात्री असल्यावर नवनिर्मितीसप्रोत्साहन मिळणे आणि त्यातून समाजाची प्रगती होणे शक्य होते असे काहींचेमत आहे.

**बौद्धिक संपदा अधिकाराची क्षेत्रे** : - निर्मितीच्या प्रकारावरून बौद्धिक संपदा अधिकाराचे प्रकार खालील प्रमाणे पडतात.

1. कला क्षेत्रातल्या निर्मितीवर – साहित्य,चित्र, शिल्प, संगीत, नाट्य किंवा चलचित्र इ. यावर त्यांच्या निर्मात्यालाकॉपीराईट (स्वामित्वहक्क) मिळतो.

2. उत्पादनाची ओळख पटवणारे चिन्ह असेल किंवा ब्रॅण्डनेम किंवा उत्पादनाची ओळख बनलेलं घोषवाक्य, यावरट्रेडमार्कमिळतो.

3. एखाद्या औद्योगिक उत्पादनाच्या सौंदर्यपूर्ण डिझाईनवर, कारचा किंवा मोबाईल फोनचा नाविन्यपूर्ण आकार, इ. वरइंडस्ट्रियलडिझाईनमिळते.

4. एखादे भौगोलिक ठिकाण जेंव्हा त्या उत्पादनाची ओळख बनते, तेंव्हा त्यावर 'जिओग्राफिकलइंडीकेटर' (भौगोलिकनिर्देशक) ही बौद्धिक संपदा मिळते.

5. एखाद्या नाविन्यपूर्ण उत्पादनावर किंवा उत्पादन बनवण्याच्या प्रक्रियेवर त्याच्या संशोधकाला मिळतं तेपेटंट (एकस्व) !

हे वेगवेगळया प्रकारचे बौद्धिक संपदा हक्क त्यांच्या निर्मात्याला यानिर्मितीवर ठराविक काळापुरते सर्वसाधारणपणे२० वर्षे स्वामित्व हक्क बहाल करतात. या काळातनिर्मात्याच्या परवानगीशिवाय ही निर्मिती कोणीही वापरू शकत नाही. त्या निर्मितीवर तिच्या मालकाची या काळात मक्तेदारी असते. निर्मात्याने हीनिर्मिती करण्यासाठी जे कष्ट, पैसा, वेळ घालवला त्याचा मोबदला म्हणून देशाचं सरकारत्याला ही मक्तेदारी बहाल करते. या कालावधीत तिच्या मालकाशिवाय दुसरेकुणीही ती गोष्ट बनवू शकत नाही. त्यामुळे त्या निर्मितीला बाजारात कुठलीहीस्पर्धा नसते. स्पर्धा नसल्यामुळे मग तिचे भाव तो निर्माता ठरवतो ते प्रचंड असतात. या वाढीवभावांमुळे मग बौद्धिक संपदा हक्क आणि इतर दुस-या कुठल्यातरी हक्कांमधेसंघर्ष होणे अटळ होऊन बसते. ज्यांना परवडेल तो विकत घेईल ज्यांना परवडणार नाही तो घेणार नाही अशी न्यायाशी विसंगत स्थिती निर्माण होते समजा कॅन्सरवर एखाद नवं औषध बाजारात आले ते एका विशिष्ट प्रकारच्या कॅन्सरला हमखास बरा करते ज्याची किमत दोन ते अडीच लाख आहे अशा वेळी ज्यांना परवडेल ते घेतील आणि नाही परवडणार ते मरतील असे आपण म्हणू शकतो का? या सारख्या कारणामुळे मुलभूत हक्क व स्वामीत्व हक्क यात द्वंद्व निर्माण होते. याबाबत खालील उदाहरण बोलके आहे.

**बौद्धिक संपदा अधिकाराची गरज व आव्हाने :-**

थॉमसजेफरीजहाऑस्ट्रेलियन नागरिक चेन्नई विमानतळावर उतरला. तो सोव्हाल्डी नावाच्या एकाऔषधाच्या शोधात इथे येऊन पोचला होता. 'सोव्हाल्डी' या ब्रॅन्डेडऔषधातलामुख्य घटक होता 'सोफोस्बुव्हीर' नावाचं औषध! जिलियाद नावाची अमेरिकन औषधकंपनी हे औषध बनवत होती. हिपॅटायटीस सी नावाच्या काविळीवर हे औषध हा एकरामबाण उपाय होता. तीन महिने हे औषध घेतलं की रुग्णाची या काविळीपासूनहमखास सुटका होत असे. सोव्हाल्डी बाजारात येण्यापूर्वी या आजारावर कुठलेहीऔषध उपल्ब्ध नव्हते. पण जेफरीजच्या देशात, ऑस्ट्रेलियात, या औषधाच्या तीनमहिन्याच्या उपचाराची किंमत होती तब्बल ८४,००० डॉलर्स! जेफरीजला सोव्हाल्डी विकत घेऊन उपचार करणे परवडणे शक्य नव्हते. स्वस्तऔषधाच्या शोधात तो भारतात येऊन पोचला होता. भारतात सोव्हाल्डीची किंमत होती९०० डॉलर्स!

हे औषध भारतात इतकं स्वस्त कां होतं आणि ऑस्ट्रेलिया, अमेरिका, युरोपात इतकं महाग कां ? याचंउत्तर शोधायला गेलं की, औषधं आणि त्यावरच्या पेटंटसबद्दलचं एक भीषण सत्य, आणि बौद्धिक संपदा कायदा विरुद्ध इतर

मूलभूत अधिकार, या संघर्षापर्यंत आपणयेऊन पोहोचतो. औषध कंपनीचा संशोधनावरचा बौद्धिक संपदा हक्क अधिक महत्वाचाकी जगणा-या प्रत्येक माणसाचा चांगलं आरोग्य मिळण्याचा असलेला मूलभूतअधिकार? असे प्रश्न पडायला लागले की जगभरात उद्भवलेले असे अनेकसंघर्ष डोळ्यासमोर उभे रहातात.

मूलभूतहक्कआणिस्वामित्वहक्कयातीलद्वंद्व कुठल्याही देशाच्या घटनेने तिथल्या जनतेला एक मूलभूत हक्क बहालकेलेला असतो, तो म्हणजे जगण्याचा हक्क! औषधावर पेटंटही त्याच देशाच्या सरकारने कायद्याने बहाल केलेले असते. अश्यावेळी घटनेने बहाल केलेला जगण्याचा मूलभूत हक्क आणि पेटंटकायद्याने बहाल केलेला स्वामित्व हक्क एकमेकांसमोर दंड थोपटून उभे रहातातआणि संघर्ष अटळ होतो. जेंव्हा अशा दोन हक्कांमध्ये संघर्ष होतो तेंव्हाअर्थातच मूलभूत हक्काला प्राधान्य मिळालं पाहिजे. कारण देशाच्या कायद्यानेदिलेल्या अधिकारापेक्षा घटनेने दिलेला अधिकार अधिक शक्तिशाली असलाच पाहिजे!औषधाचे गि-हाईक असलेल्या गरीब सामान्य नागरिकाच्या बाजूने हा मूलभूत हक्क असतोआणि पेटंट हक्क मात्र देशातले व्यवसाय आणि अर्थकारणाचा भागअसणाऱ्या औषध कंपनीच्या बाजूने असतो. अश्यावेळी, दोंघांपैकी कुणाच्याबाजूने पारडे झुकू द्यायचे, हे त्या त्या देशाला ठरवायला लागते. त्यानुसारआपल्या देशाचे पेटंट धोरण आखावे लागते. साधारणपणे जर देश गरीब किंवाविकसनशील असेल तर त्या देशाच्या सरकारचे पेटंट धोरण, सामान्य-गरीब जनतेच्याबाजूचे असायला हवे. म्हणजेच औषधासारख्या जीवनावश्यक वस्तूवर अशा देशाने सहजासहजीपेटंट्स देता कामा नयेत जेणे करून सामान्य जनतेला औषधं सहज उपलब्ध होतील.या उलट जर देश श्रीमंत असेल, उत्पादक असेल, तर जनतेची आर्थिक परिस्थितीतुलनेने चांगली असते. या देशांच्या अर्थव्यवस्थेच्या हितासाठी पेटंट धोरण प्रभावीपणे राबवणे योग्य ठरेल.

आज कोरोना महामारीच्या काळात बौद्धिक संपदा अधिकाराबाबत अनेक विवाद निर्माण झाले एक तर कोरोणा वरील उपचार पद्धती निश्चित होत नव्हती आरोग्य यंत्रणा स्वैरभैर झालेली होती जी औषधे उपयोगी ठरतील असे वाटत होते त्यांचे भाव वारेमाप होते रेमडेसिवीरचा काळाबाजार सुरु होता त्यांचे भाव सर्वसामान्याच्या आवाक्या बाहेर होते लसीवर संशोधन सुरु होते लस निर्मिती झाल्यावर उत्पादक कंपन्यांनी त्याचा लाभ बौद्धिक संपदा अधिकाराखाली घ्यायला सुरवात केली त्यातून मनुष्य जातीचे संरक्षण महत्वाचे की पेटंट कायदाआधारे उत्पादक कंपन्यांचे हित महत्वाचे हा प्रश्न चर्चेचा केंद्रबिंदू ठरला त्यातून केंद्र सरकारने लस द्यायची की राज्यसरकारने का लोकांनी स्वतः विकत घ्यायची या बाबत गोंधळ देशाने अनुभवला या पार्श्वभूमीवर बौद्धिक संपदा अधिकारावर चर्चा प्रासंगीक ठरते.

जे देश अमेरिकाधार्जिणे नाहीत त्यांना तुमचे बौद्धिक संपदा धोरण आमच्या धार्जिणे बनवा नाही तर व्यापारी निर्बंध सहन करायला तयार व्हा अशी धमकी दिली गेली बौद्धिक संपदा हक्क हा तोल सांभाळण्याचा खेळ आहे. जितका एखादा देश बौद्धिक संपदांना अधिकाधिकसंरक्षण देतो तितका बाजारपेठेत अधिकाधीक मक्तेदारी निर्माण करतो. जितकी मक्तेदारी जास्त तितकी बाजारात स्पर्धा कमी होते. स्पर्धा कमी झाली की उत्पादनांच्या किमती गगनाला भिडतात. किंमती वाढल्या की समाजातील मोठ्या वर्गाला त्या परवडेनाशा होतात. मग हा मोठा वर्ग या वस्तू वापरण्यापासून वंचित राहतो आणि जेव्हा या वस्तू औषधांसारख्या जीवनावश्यक वस्तू असतात तेव्हा मग हे फार धोकादायक बनते.

बौद्धिक संपदा हक्क आणि भारत मोदी सरकारच्या 'मेक एन इंडिया' धोरणामुळे अधिकाधिक परदेशी कंपन्यांनी भारतात उत्पादन सुरु करावे असे आवाहन केले जात आहे. पण मग येथे उत्पादन करायचे असेल तर त्यासाठी भारताचे जनता धार्जिणे धोरण बदलून परकीय धार्जीने करायला हवे आणि ते तसे केले जाईल अशी हमी या परदेशी कंपन्यांना द्यायला हवी. भारताचे नवे २०१६ चे बौद्धिक संपदा धोरण हा हेच करण्याचा प्रयत्न आहे. पण त्यात अधून मधून सामान्य जनतेची काळजी केल्यासारखेही दाखवले आहे. बौद्धिक संपदेच्या यादीत अमेरिका प्रथम, चीन तृतीय तर भारत ५३ देशांच्या यादीत ४० व्या क्रमांकावर आहे.

२०१६ ला भारताचे पहिलेवहिले बौद्धिक संपदा धोरण जाहीरं करण्यात आले औषधाच्या किमती कमी ठेवायला मदत करणारी सक्तीचे परवाने ही भारतीय पटंट कायद्यातली अत्यंत महत्त्वाची तरतूद आहे आणि बौद्धिक संपदांबाबत काय पवित्रा घ्यायचा याविषयी उडालेला भारताचा गोंधळ पुन्हा एकदा अधोरेखित झाला. भारताच्या नुकत्याच जाहीर झालेल्या बौद्धिक संपदा धोरणाची चिकित्सा करण्याआधी मुळात काही मूलभूत गोष्टी लक्षात घेऊ या. भारताचे बौद्धिक संपदा धोरण संशोधनाला पाठिंबा देणारे नाही, अशी ओरड सगळे विकसित देश सध्या करत आहेत. याच विकसित देशांनी 'मेक इन इंडिया' कार्यक्रमात भारतात गुंतवणूक करावी म्हणून भारत सरकार त्यांना आमंत्रण देते आहे. पण भारतात गुंतवणूक करायची तर भारताने आपले बौद्धिक संपदा धोरण सुधारले पाहिजे असा प्रगत देशांचा आग्रह आहे. त्यामुळे भारत बौद्धिक संपदेला संरक्षण देण्याच्या बाबतीत किती खराब कामगिरी करतो आहे असा गळा भारतीय प्रसारमाध्यमे काढताना दिसली.

कुठला देश बौद्धिक संपदांना जास्त संरक्षण देतो आणि कुठला देश कमी देतो. बौद्धिक संपदा कोणकोणत्या? तर 'नवनव्या संशोधनांवर देण्यात येणारी पेटंट, उत्पादनांची चिन्हे म्हणून वापरली जाणारे ट्रेडमार्क्स, पुस्तके, संगीत, चित्रपटावर दिले जाणारे कॉपीराइट, भोगोलिक निर्देशक, औदयोगिक डिझाइन, ट्रेड सिक्रेट्स वगैरे. तर जो देश या बौद्धिक संपदांचे अधिकाधिक संरक्षण करेल, म्हणजे त्यांच्या मालकांनाजो जास्तीत जास्त मक्तेदारी मिळवून देईल तो पहिला आणि जो कमी संरक्षण देईल तो शेवटच्या क्रमांकावर. बरे पण ही परीक्षा घेणार कोण? तर या परीक्षेला बसलेल्या देशातलाच एक बलाढ्य, दादागिरी करणारा देश. म्हणजे अर्थात अमेरिका. अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सचे ग्लोबल इटलेक्च्युअल प्रॉपर्टी सेंटर दरवर्षी ही आकडेवारी जाहीर करत असते. जागतिक बौद्धिक संपदा संघटना (डब्ल्यूआयपीओ) किवा जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) सारख्या त्रयस्थसंघटनेने केलेले हे मूल्यमापन नव्हे. म्हणजे मुळात ही परीक्षा कुठला देश बौद्धिक संपदेला किती चांगले संरक्षण देतो याची नाहीच तर ही परीक्षा आहे कुठल्या देशाचे धोरण अधिकाधिक अमेरिका आणि तिथल्या मोठमोठ्या अमेरिकी उद्योगांना धार्जिणे आहे याचीअमेरिकेचे स्वतःचे बौद्धिक संपदा धोरण तेथील उद्योगांच्या सोयीचे असणार हे उघड आहे आणि म्हणून तिचा क्रमांक पहिला! भांडवलशाही व्यवस्थेकडून दुसरी अपेक्षा तरी काय करणार? जॉर्ज ऑर्वेलच्या एका वाक्याची येथे आठवण झाल्याशिवाय राहात नाही- 'ऑल अनिमल्स आर इक्वल, बट समऍनिमल्स आर मोअर इक्वल दॅन आदर्स' बौद्धिक संपदा हक्कांचे काम आहे सर्जनशीलता आणि प्रयोगशीलतेचे संरक्षण करणे. पण मग या हक्कांचे संरक्षण असणाऱ्या कायद्यांमध्येही अशी सर्जकता नको का? १९६५ साली अय्यंगार समितीने सादर केलेला याबाबतचा प्रस्ताव आणि त्यावर आधारित भारताचा पेटंट कायदा हे अशा सर्जनशीलतेचे प्रतीक आहे. ज्यात औषधांच्या किमती कमीत कमी राहतील, जेणेकरून त्या सामान्य जनतेला परवडतील, यासाठी ट्रिप्स करारातील धूसरतेचा वापर करून दूरदृष्टीनेकेलेल्या अत्यंत सर्जक अशा तरतुदी आहेत.

औषधांवरील पेटंटचे पुनरुज्जीवन थांबवणारे कलम ३ड किंवा औषधाच्या किमती अवास्तव वाढू नयेत, औषध सतत स्वस्तात उपलब्ध राहावीत म्हणून असलेली सक्तीच्या परवान्यांची सुविधा किंवा १९९५च्या आधी असलेली औषधांवर उत्पादन पेटंट न देण्याची सुविधा ही याची काही उदाहरणे. या तरतुदींमुळेच भारतीय औषध निर्माण उद्योगाने भरारी घेतली आणि स्वस्त पण उत्तम प्रतीची जेनेरिक औषधे सगळ्या जगाला पुरवीणारी जगाची फार्मसी "म्हणून नाव कमावले. भारताच्या बौंद्धिक संपदा धोरणामुळे औषधांच्या किंमती कमी झाल्या, गरीब जनतेला औषधांपर्यंत पोचता येऊ लागले. शिवाय भारतीय औषध निर्माण उद्योगही भरभराटीला आला. पण नेमके यामुळेच बल्लाढ्य देशांची वक्रदृष्टी भारताकडे वळली आणि आपले हे धोरण बदलण्यासाठी भारतावर निरनिराळ्या मार्गाने दबाव वापरणे सुरू झाले. एकीकडे भारताचा सध्याचा बौद्धिक संपदा कायदा ट्रिप्स सहमत आहे असे हे धोरण म्हणते. तर दुसरीकडे नवे बौद्धिक संपदा धोरण हे वैश्विक मानकांप्रमाणे आहे अशी वल्गना ते जाहीर करताना केली गेली! अशी वैश्विकमानके कुठली? तर ट्रिप्स करार हे ते एकमेव मानक आहे. मग भारताचा सध्याचा बौद्धिक संपदा कायदा हा या मानकांप्रमाणे नाही का? तर १०० टक्के आहे! मग जर हा कायदा वैश्विक मानकांप्रमाणे आहे आणि जनतेच्याही फायद्याचा आहे, तरी नवे धोरण कशासाठी? तर बलाढ्य उद्योगांना आणि देशांना त्यांच्या सोयीचे वाढीव संरक्षण देण्यासाठी तर आहे.

'रचनात्मक भारत.. अभिनव भारत' अशी घोषणा देत आलेले हे बौद्धिक संपदा धोरण जिथे जिथे शक्य आहे तिथे बौद्धिक संपदा निर्माण करण्यावर भर देणार आहे. कारण त्याने संशोधनाला चालना मिळेल असे गृहीत धरले गेले आहे. 'बौद्धिक संपदांना दिले जाणारे संरक्षण जितके अधिक तितके संशोधन अधिक' या चुकीच्या गृहीतकावर भारताचे नवे धोरण आधारलेले दिसते आहे. काही क्षेत्रांपुरते हे खरे असेलही. पण इतर अनेक क्षेत्रांत बौद्धिक संपदांना दिले जाणारे कमालीचे संरक्षण उलट संशोधनाला मारक ठरते. किरकोळ संशोधनांनाही मक्तेदारी देऊ केली तर ती शास्त्रज्ञांना असलेल्या संशोधनात सुधारणा करण्यापासून थांबवते हे सिद्ध झाले आहे. नव्या बौद्धिक संपदा धोरणानुसार सार्वजनिक अनुदानित संशोधन संस्थांमधील शास्त्रज्ञांना आणि प्राध्यापकांना त्यांच्या प्रत्येक संशोधनावर पेटंट घेणे सक्तीचे करण्यात आले आहे. त्यांच्या पदोन्नतीची सांगड त्यांनी मिळवलेल्या पेटंटशी घातली जाणार आहे. अमेरिकेतील अनेक विद्यापीठांची परिस्थिती आज अशी आहे की, बौद्धिक संपदा हक्क विकून त्यांना मिळालेल्या पैशांपेक्षा ते हक्क नोंदणीकृत करण्यासाठी त्यांचा झालेला खर्च जास्त आहे. बेन्जामिन फ्रॅकलिन किंवा जगदीशचंद्र बोससारख्या शास्त्रज्ञांनी संशोधनांचा प्रवाह थांबू नये म्हणून पेटंट घ्यायचे नाकारले होते हे आपण विसरलो आहोत. या धोरणानुसार सर्व शाळा आणि महाविद्यालयात म्हणे आता मुलांना बौद्धिक संपदा कायद्याचे धडे दिले जाणार आहेत? हे कशासाठी? शाळेत जाणाऱ्या मुलांना तिथे जाऊन अधिकाधिक सर्जक व्हायला,तर्कशुद्ध विचार करायला शिकवायचे, डोक्यातल्या कल्पनांना मुक्त भरारी मारायला शिकवायचे की त्यांना बौद्धिक संपदा हक्कांचे कुंपण घालायला शिकवायचे? शाळेच्या वयात हे सगळे शिकण्याची गरज तरी आहे का? भारतात मुळात

संशोधक वृत्ती कमी होत आहे हे मान्य. अगदी बोटावर मोजण्याइतकी संशोधने भारताने जगाला दिली आहेत हेही मान्य. पण शालेय स्तरावर बौद्धिक संपदा कायदा शिकवून संशोधकवृत्ती वाढीला लागेल असे या धोरणाच्या लेखकांना वाटत असेल तर तो ठार चुकीचा समज आहे. संशोधकतेला खतपाणी घालण्यासाठी मुलांना कल्पनेच्या भराऱ्या मारू दिल्या पाहिजेत. बंधनमुक्त शिकणे शक्य केले पाहिजे. बौद्धिक संपदा हे संशोधनाला चालना देण्यासाठी वापरायचे एक साधन आहे, साध्य नव्हे! नव्या धोरणाची गफलत ही की त्याने संशोधनाला संरक्षीतसंपदा हे साध्य मिळविण्याचे साधन बनविले आहे.

**निष्कर्ष :**

अशा प्रकारे उपयुक्त विश्लेषणावरून बौद्धिक संपदा कायद्याची गरज स्पष्ट होते. जगातील बहुतेक सर्वच देशांमध्ये बौद्धिक संपदेच्या अधिकाराबाबत जागरूकता निर्माण झालेली आढळून येते. विशेषत: विकसित देश या कार्यात अग्रणी असून आज हळूहळू विकसनशील देश देखील बौद्धिक संपदेच्या अधिकाराबाबत दिवसेंदिवस अधिक सजग बनत आहेत. बौद्धिक संपदा अधिकारांच्या माध्यमातून व्यक्ती व संस्था यांच्या सर्जनशीलता व प्रयोगशीलतेचे संरक्षण करण्यास मदत होते. असे असले तरी याचा एक धोका देखील टाळता येणार नाही आणि तो म्हणजे स्वामित्व हक्क व राज्य घटनेद्वारे बहाल व्यक्तींचे मुलभूत अधिकार यांच्यातील द्वंद्व. वास्तविक व्यक्ती व देशांचा विकास हा शोध, नवनिर्मिती व प्रयोगशिलतेच्या माध्यमातूनच शक्य असल्याने बौद्धिक संपदा अधिकाराची गरज त्यासाठी अपरिहार्यच म्हणावी लागेल. परंतु त्यामुळे सर्वसामन्यांचे हित धोक्यात येणार नाही, याची दक्षता घेणे हे देखील तितकेच गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर खरे तर भारता सारख्या विकसनशील देशाने आपल्या ‘रचनात्मक भारत-अभिनव भारत’ निर्माण करण्यासाठी बौद्धिक संपदा धोरणाची आखणी करताना आर्थिक विकासाचे उदिष्ट्ये प्राप्त करण्याच्या घाईत सामान्य व्यक्तीला प्राप्त मुलभून अधिकारांचा बळी जाणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

(१) महाराष्ट्र टाईम्स, २० ऑगस्ट २०१६

(२) दृष्टी शोधपत्रिका

(३) प्रतियोगिता दर्पण

(४) डॉ. एस. के. सिंह बौद्धिक संपदा अधिकार विधी सेंट्रल लॉएजेंसी, नई दिल्ली.

(५) देश उन्नती पत्रिका

(६) विकिपीडिया